मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# ..अखेर महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेला आयोगाची मंजुरी

## मिशन महापालिका: पिंपरी-चिंचवडकर नागरिकांना 4 सप्टेंबरपर्यंत हरकती नोंदवण्याची संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या प्रारूप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास राज्य निवडणूक आयोगाने अंतिम मान्यता दिली असून, सदर प्रारूप अधिसूचना आज जाहीर करण्यात आली. दरम्यान नागरिकांना 22 ऑगस्ट ते 4 सप्टेंबरपर्यंत हरकती नोंदवण्याची संधी देण्यात आली आहे.

प्रारूप अधिसूचनेची प्रसिद्धी पिंपरी -चिंचवड महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात करण्यात आले आहे. या अधिसूचनेच्या अनुषंगाने नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक संस्था आणि इतर संबंधित घटकांकडून हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.




राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सदर प्रारूप प्रभाग रचना ही केवळ प्रस्तावित असून, अंतिम रचना हरकती व सूचनांच्या तपासणीनंतरच निश्चित केली जाणार आहे.

महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, नागरिकांनी आपल्या प्रभागातील संभाव्य बदलांची सविस्तर माहिती घेतली पाहिजे आणि जर काही आक्षेप किंवा सूचना असतील, तर त्या लेखी स्वरूपात ठरवून दिलेल्या कालमर्यादेत सादर कराव्यात. यानंतर आयोगाकडून या सूचना विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना निश्चित केली जाईल.

**महापालिकेचे आवाहन:**

"महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी या प्रारूप प्रभाग रचनेचा सखोल अभ्यास करावा. आपल्या परिसरातील संभाव्य बदल समजून घ्यावेत व आवश्यक असल्यास आपल्या हरकती लेखी स्वरूपात महापालिकेकडे सादर करावीत," असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### 4 सप्टेंबर पर्यंत हरकती नोंदविता येणार

» प्रारूप प्रभाग रचनेसाठी नागरिकांना 22 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर पर्यंत हरकती नोंदविता येणार आहे.
» 5 ते 12 सप्टेंबर दरम्यान हरकतींवर सुनावणी होणार आहे. 13 ते 15 सप्टेंबर सुधारणा सह अंतिम प्रभाग रचना सादर करणार असून, 3 ते 6 अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### अधिसूचनेतील महत्त्वाचे मुद्दे:

» प्रारूप प्रभाग रचना आजपासून प्रसिद्ध
» 28 ऑगस्टपर्यंत हरकती नोंदवण्याची संधी
» महापालिकेच्या संकेतस्थळावर व मुख्य कार्यालयात अधिसूचना उपलब्ध
» नागरिक, संस्था व राजकीय पक्षांना हरकती नोंदविण्याची संधी
» अंतिम प्रभाग रचना हरकतींच्या अन्वयार्थ निश्चित केली जाणार

### प्रभाग रचनेची प्रमुख वैशिष्ट्ये:

» ३२ प्रभाग: पिंपरी चिंचवड महापालिकेत एकूण ३२ प्रभाग असतील.
»४ सदस्यीय प्रभाग: प्रत्येक प्रभागातून चार सदस्य निवडले जातील.
»१२८ जागा: या रचनेत एकूण १२८ जागा उपलब्ध होतील.

---

# चिखलीसह सानेचौक परिसरात रस्त्यांची पुन्हा दुरावस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली- सोनवणे वस्ती रस्ता... पिंगळे रस्ता कॉर्नर...मोरेवस्ती... चिखली-आकुर्डी रस्ता या बाह्य व अंतर्गत रस्त्याची जोरदार पावसामुळे पुन्हा चाळण झाल्याचे चित्र सध्या पहायला मिळत आहे. तात्पुरती केलेली मलमपट्टी पुन्हा वाहून गेल्याने रस्ते खड्डे रहीत जैसे थे असल्याचे चित्र परिसरात पहायला मिळत आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने शहराच्या अन्य भागांप्रमाणेच चिखलीमधील रस्त्यांचीही दुर्दशा झाली आहे. वाहन चालक आणि पादचाऱ्यांना खड्ड्यांमधून रस्ता कुठे दिसतो का? हे शोधावे लागत आहे.

चिखली परिसरातील सोनवणे वस्ती, मोरे वस्ती, चिखली इत्यादी परिसरात महापालिकेकडून सांडपाणी वाहिन्या आणि पावसाळी गटारे बांधण्यासाठी उन्हाळ्यामध्येच रस्त्यांची खोदाई करण्यात आली होती. त्या रस्त्यांची गेल्या १५ दिवसांपूर्वीच डागडुजी करण्यात आली. मात्र, तकलादू काम केल्याने गेल्या दोन दिवस पडलेल्या संततधार पावसामुळे रस्त्यांवर टाकण्यात आलेले डांबर आणि खडी उखडून गेली आहेत. त्यामुळे संपूर्ण रस्त्याची पुन्हा चाळण झाली. रस्त्यांना अक्षरशः डबक्याचे स्वरूप आले आहे. अनेक नागरिकांचे विशेषतः महिलांचे रस्त्यांवरून वाहन चालवताना अपघात होत आहेत. या रस्त्यांवरून वाहन चालवत



असताना कंबर आणि मणके अक्षरशः ठेचून निघत आहेत. या प्रकाराकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने पाहावे आणि चिखली परिसरातील रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवावेत, अशी नागरिकांची मागणी आहे.

> गेली दोन दिवस सतत पाऊस पडत असल्याने पुन्हा खड्डे पडले आहेत. पाऊस उघडल्यानंतर लगेचच खड्डे बुजवून डांबरीकरण करण्यात येईल.
> - व्ही.डब्ल्यू.वायकर, अभियंता (स्थापत्य) महापालिका.

> उन्हाळ्यामध्ये करावयाची कामे भर पावसाळ्यात महापालिका प्रशासन करते आहे. काही ठिकाणी अजूनही खोदकाम करून उखडून ठेवले आहे. तर ज्या ठिकाणी ड्रेनेज लाईनचे काम केले, त्याठिकाणी वरवरचा मुलामा रस्त्यावर केल्याने पावसात खडी वाहून गेली आहे. पुन्हा रस्ते खड्डयात गेल्याचे चित्र आहे. प्रशासकीय राजवटीत चाललंय तरी काय? अंतर्गत अन् बाह्य रस्त्यांची चाळण झाल्याने नागरिकांचे वाहनचालक त्रस्त होत आहेत.
> - साधना मळेकर, माजी नगरसेविका.

> दरवर्षी चिखली परिसरातील रस्त्यांची हीच स्थिती असते. भर पावसाळ्यात खोदकाम, तात्पुरती डागडुजी पुन्हा पावसात रस्त्याची चाळन हेच सत्र सुरु असते. याचा परिणाम वाहनचालक अन् नागरिकांवर होतो. अधिकाऱ्यांना काही घेणे-देणे नसते. राधास्वामी सत्संग कॉर्नर ला चार दुचाकीस्वार नादुरूस्त रस्त्यामुळे घसरून पडले. तरीही रस्ता जैसे थे, अधिकारी खुर्चीवरून खाली उतरून फिल्डवर आल्यास त्यांना समजेल रस्त्यांची काय दुरावस्था आहे.
> - जितेंद्र यादव, सामाजिक कार्यकर्ते.

# वेस्ट टू वंडर थीम पार्कचे काम दोन महिन्यात पूर्ण करा

## थीम पार्कचे काम वेळेत आणि काटेकोर नियोजनासह पूर्ण करा; अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

वेस्ट टू वंडर थीम पार्कचे काम पुढील दोन महिन्यांत काटेकोर नियोजनासह पूर्ण करा. उद्यानात उभारण्यात येणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंच्या प्रत्येक प्रतिकृतीचे काम दर्जेदार करण्यात यावे. हे उद्यान अधिक वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाबीचे सूक्ष्म नियोजन करण्यात यावे, असे निर्देश पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिले.



अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी पिंपळे सौदागर येथील राजमाता जिजाऊ उद्यानातील 'वेस्ट टू वंडर थीम पार्क'ला भेट देत सुरू असलेल्या सर्व कामांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांनी पार्कमधील फूड स्टॉल, नागरिकांसाठी पार्किंगची सुविधा, तिकीट काउंटर, सुशोभीकरणाच्या दृष्टिने वृक्ष लागवड, वास्तूंची सुरक्षितता, सुरक्षा रक्षकांची नेमणूक, कंपाऊंड भिंतीचे काम, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, रंगरंगोटी तसेच स्थापत्य व विद्युत विभागाशी संबंधित विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला.

विद्युत रोषणाईसह इतर विद्युत विषयक कामे महावितरण विभागाशी समन्वय साधत मार्गी लावा, बांधकाम परवानगी तसेच इतर स्थापत्य विषयक कामे तातडीने पूर्ण करा, असे निर्देशही त्यांनी संबंधित विभागाला दिले. यावेळी कामातील गॅप ॲनालिसिसची तपासणी करून उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

याप्रसंगी सह शहर अभियंता मनोज सेठीया, माणिक चव्हाण, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक योगेश वाळूज, कार्यकारी अभियंता वि. के. जाधव, सचिन नांगरे यांच्यासह स्थापत्य, विद्युत, उद्यान अशा विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील म्हणाले, 'वेस्ट टू वंडर थीम पार्क हे पिंपरी चिंचवडकरांसाठी एक वेगळे आकर्षण ठरेल. येथे टाकाऊ वस्तूंपासून उभारल्या जाणाऱ्या प्रत्येक वास्तूची गुणवत्ता उच्च दर्जाची असावी. हे उद्यान अधिक वैशिष्ट्यपूर्ण होण्यासाठी प्रत्येक बाब काटेकोर आणि नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. या उद्यानातील सर्व सुविधा व्यवस्थित असल्या पाहिजेत. पुढील दोन महिन्यांत या उद्यानाचे सर्व काम वेळेत पूर्ण करण्यात यावे,' असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### टाकाऊ साहित्यापासून ऐतिहासिक वास्तूंच्या प्रतिकृती!

वेस्ट टू वंडर थीम पार्कात जगभरातील १७ जागतिक दर्जाच्या ऐतिहासिक आणि कलात्मक वास्तूंच्या प्रतिकृती टाकाऊ साहित्यापासून उभारल्या जात आहेत. यामध्ये ताजमहल, आयफेल टॉवर, बुर्ज खलिफा, लीनिंग टॉवर ऑफ पिसा, सिडनी ऑपेरा हाऊस, अजंठा लेणी, ला सागराडा फॅमिलीया, चिचेन इत्झा, पिरॅमिड ऑफ गिझा, पेट्रा ऑफ जॉर्डन, कोलोसियम ऑफ रोम, बिग बेन ऑफ लंडन, अंकोर वट ऑफ कंबोडिया, हंपी चारियट, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ट्रेव्ही फाउंटन आणि माऊंट रश्मोर आदी जगप्रसिद्ध कलाकृती साकारण्यात आल्या आहेत. या प्रतिकृतींमुळे उद्यानाला जागतिक वारशाची झलक मिळणार असून पर्यावरणपूरक पद्धतीने टाकाऊ साहित्याचा अभिनव उपयोग येथे केला जात आहे.

### अतिरिक्त आयुक्तांनी केली पाहणी

» अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ग प्रभागातील साधु वासवानी उद्यानाला भेट देत पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्यानाचे सुशोभीकरण करण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उद्यानातील मोकळ्या जागेत आकर्षक सुशोभिकरण करावे, उद्यानात ठिकठिकाणी सूचना फलक लावण्यात यावेत, दिव्यांगाना प्रवेश सुखकर करण्याच्या दृष्टिने उपाययोजना कराव्यात, पावसामुळे उद्यानात साचणाऱ्या पाण्याची योग्य ती विल्हेवाट लावावी, असे निर्देशही अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी दिले.

# स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयासाठी पाठपुरावा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी; भाजपा आमदार महेश लांडगे यांचे निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय स्थापन करण्याची मागणी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सद्यस्थितीत नागरिकांना व रास्तभाव दुकानदारांना अन्नधान्य वितरणाशी संबंधित कामांसाठी थेट पुणे कार्यालयात जावे लागते. यामुळे त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात आहेत, असे लांडगे यांनी नमूद केले आहे.



पिंपरी-चिंचवडसह देहू कॅन्टोनमेन्ट, देहू नगरपंचायत व काही भागांतील एकूण लोकसंख्या ३० लाखांच्या घरात असून, भोसरी, चाकण, तळेगाव, हिंजवडीसारख्या औद्योगिक पट्ट्यांमुळे स्थलांतरितांची संख्या झपाट्याने वाढत आहे. अशा वेळी, फक्त तीन परिमंडळ अन्नधान्य कार्यालयांवर कामकाजाचा वाढता भार पडत असल्याने नागरिक व दुकान चालकांना पुण्यात जावे लागते. त्यात वेळेचा अपव्यय होतो, असेही आमदार लांडगे यांनी नमूद केले.

सोलापूरसारख्या शहरात केवळ ११ लाख लोकसंख्येसाठी स्वतंत्र अन्नधान्य कार्यालय कार्यरत आहे, याची उदाहरणासह तुलना देत लांडगे यांनी पिंपरी-चिंचवडसारख्या वाढत्या लोकसंख्येच्या शहरात स्वतंत्र कार्यालयाची गरज अधोरेखित केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या मागणीची गंभीर दखल घ्यावी व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वतंत्र अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय तातडीने सुरू करावे, अशी विनंती आमदार लांडगे यांनी आपल्या पत्रात केली आहे.

### स्वतंत्र कार्यालय स्थापन झाल्यास होणारे फायदे:

1. सामान्य नागरिकांच्या अडचणी दूर होतील.
2. रास्तभाव दुकानदारांचे कामकाज अधिक सुलभ होईल.
3. शासकीय कर्मचाऱ्यांचा वेळ आणि श्रम वाचेल.
4. शासकीय कामकाजात गतिमानता येईल.
5. लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावता येतील.

> “ पिंपरी-चिंचवडसारख्या ३० लाख लोकसंख्येच्या औद्योगिक आणि वेगाने वाढणाऱ्या शहरात अन्नधान्य वितरणासाठी स्वतंत्र अधिकारी कार्यालय असणे ही काळाची गरज आहे. नागरिक आणि रास्तभाव दुकानदारांना पुण्यात धावपळ करण्यापेक्षा स्थानिक स्तरावरच सेवा उपलब्ध झाल्यास कार्यक्षमता वाढेल आणि जनतेचे हाल टळतील.
>
> – **महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# गणेशोत्सवात रात्री दोनपर्यंत धावणार मेट्रो

## 30 ऑगस्ट ते 5 सप्टेंबर या काळात 20 तास सेवा 'मेट्रो' देणार; सलग 41 तास मेट्रो धावणार

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात मेट्रोसेवा पुणेकरांना अधिक काळ मिळणार असून, ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर या काळात २० तास सेवा 'मेट्रो' देणार आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) पुणे विभागाने हा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (महामेट्रो) पुणे विभागाने १५ ऑगस्टपासून मेट्रोच्या फेऱ्या सहा मिनिटांवर आणल्या होत्या. आता गणेशोत्सवानिमित्त मेट्रोसेवा सुरू असण्याची वेळ आठ दिवस वाढवली आहे. सध्या रोज १७ तास मेट्रो धावत आहे. ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबरपर्यंत या वेळेत वाढ करण्यात आली असून, रात्री दोन वाजेपर्यंत (२० तास) मेट्रो सेवा सुरू राहणार आहे. तर, ६ आणि ७ सप्टेंबर रोजी सलग ४१ तास मेट्रो सुरू ठेवण्यात येणार आहे. मेट्रोच्या निर्णयाचा गणेशभक्तांना फायदा घेता येणार आहे.



पुण्यातल्या गणेशोत्सवाचे जगभर आकर्षण असते. या काळात प्रवासी जाण्या-येण्यासाठी मेट्रोला पसंती देतात. यंदा जिल्हा न्यायालय ते स्वारगेट ही भूमिगत मेट्रोही सुरू झाली आहे. या मार्गावर जिल्हा न्यायालय, कसबा पेठ, मंडई व स्वारगेट ही पुण्याच्या मध्य वस्तीत असलेली स्थानके असून, या परिसरात प्रतिष्ठित आणि मानाची गणेशमंडळे आहेत.

मध्यवर्ती पेठांच्या परिसरात वाहतूक कोंडी होत असल्याने प्रवाशांना सुलभ सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मेट्रोच्या वेळेत बदल करून मेट्रोची प्रवासी सेवा मध्यरात्रीपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी दिली.

### कसे असणार वेळापत्रक?

- दिनांक – वेळ – एकूण वेळ
- २७ ते २९ ऑगस्ट – सकाळी ६ ते रात्री ११ – १७ तास
- ३० ऑगस्ट ते ५ सप्टेंबर – सकाळी ६ ते रात्री २ – २० तास
- ६ आणि ७ सप्टेंबर – सकाळी ६ ते दुसऱ्या दिवशी रात्री ११ पर्यंत – ४१ तास

> पुणेकरांसह देशविदेशातून येणाऱ्या भाविकांना यंदाचा गणेशोत्सव पुणे मेट्रोच्या जलद, सुरक्षित आणि सुलभ प्रवासासह साजरा करता येणार आहे. प्रशासनाकडून करण्यात आलेली ही सुविधा शहराच्या वाहतूक व्यवस्थेसाठी आणि पर्यावरण रक्षणासाठीही सकारात्मक पाऊल ठरणार असून, प्रवाशांनी त्याचा लाभ घ्यावा.
>
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो, पुणे.**

---

# रिंग रोडबाबत पीएमआरडीए आयुक्तांसह जिल्हाधिकाऱ्यांचे मोठे पाऊल

## पुणे परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध यंत्रणांमार्फत उपाययोजनांवर भर

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध यंत्रणांमार्फत उपाययोजनांवर भर दिला जात आहे. यात प्रामुख्याने वर्तुळाकार मार्गासह (रिंग रोड) इतर प्रस्तावित रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने तातडीने मोजणीसह भूसंपादन प्रक्रिया राबविण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी गुरुवारी दिले.

पुणे परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध प्रशासकीय यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक डॉ. म्हसे यांनी घेतली. या बैठकीत प्रामुख्याने प्रस्तावित रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने तातडीने मोजणीसह भूसंपादन प्रक्रिया राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. ते म्हणाले, 'पुणे शहरासह इतर काही भागांत सातत्याने होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत. हिंजवडी आणि चाकण भागातील वाहतुकीसह नागरी समस्या सोडविण्यासाठी रस्ते रुंदीकरणासह विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यासह वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) आणि राष्ट्रीय महामार्गांसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. यासंदर्भात तातडीने मोजणी करून भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा.'



या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी आणि नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील, मुख्य अभियंता रिनाज पठाण, भूसंपादन समन्वय अधिकारी कल्याण पांढरे, सहआयुक्त हिम्मत खराडे, भूमिअभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, पुणे महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासह इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

वर्तुळाकार मार्गासाठी टप्प्याटप्प्याने भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येत असून, आजपर्यंत झालेल्या कार्यवाहीचा आढावा आयुक्त डॉ. म्हसे आणि जिल्हाधिकारी डुडी यांनी या बैठकीत घेतला. वर्तुळाकार मार्गाच्या (रिंग रोड) पहिल्या टप्प्यात नाशिक महामार्ग ते नगर रस्ता या दरम्यानच्या सोलू, सोलू इंटरचेंज, वडगाव शिंदे आणि निरगुडी या गावांमधील मोजणी पूर्ण झाली असून, भूसंपादनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. दुसऱ्या टप्प्यात नगर रस्ता ते सोलापूर रस्ता या मार्गावरील आंबेगाव खुर्द आणि भिलारेवाडीची संयुक्त मोजणी पूर्ण झाली आहे. तिसऱ्या टप्प्यात सोलापूर रस्ता ते सातारा रस्ता आणि चौथ्या टप्प्यात सातारा रस्ता ते पौड रस्ता या मार्गावरील भूसंपादन प्रक्रियेवर या बैठकीत चर्चा झाली. या मार्गाला गती देण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यावरही बैठकीत चर्चा करण्यात आली.

> हिंजवडी आणि चाकण भागातील वाहतुकीसह नागरी समस्या सोडविण्यासाठी रस्ते रुंदीकरणासह विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. यासह वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) आणि राष्ट्रीय महामार्गांसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे.
>
> **- डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, पीएमआरडीए.**

# चाकणमधील वाहतूक कोंडी फुटणार!

## नाशिक फाटा ते राजगुरूनगर उन्नत मार्गासह बाह्यवळण मार्गांसाठी भूसंपादनाचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण परिसरात वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नाशिक फाटा ते राजगुरुनगर उन्नत मार्ग तयार करण्यात येणार आहे. याचबरोबर चाकण शहरात पर्यायी बाह्यवळण मार्ग तयार केला जाणार आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी गुरुवारी दिले.



पुणे परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध प्रशासकीय यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक डॉ. म्हसे यांनी घेतली. या बैठकीत प्रामुख्याने प्रस्तावित रस्ते रुंदीकरणाच्या अनुषंगाने तातडीने मोजणीसह भूसंपादन प्रक्रिया राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले. ते म्हणाले की, पुणे शहरासह इतर काही भागांत सातत्याने होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पावले उचलली जात आहेत. हिंजवडी आणि चाकण भागातील वाहतुकीसह नागरी समस्या सोडविण्यासाठी रस्ते रुंदीकरणासह विविध उपाययोजना करण्यात येत आहे. याचबरोबर वर्तुळाकार मार्ग (रिंग रोड) आणि राष्ट्रीय महामार्गांसाठी आवश्यक असलेल्या जमिनीची भूसंपादन प्रक्रिया सुरू आहे. यासंदर्भात तातडीने मोजणी करून भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा.

या बैठकीत नाशिक फाटा ते राजगुरुनगर या मार्गावरील उन्नत मार्गासाठी नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, वाकी खुर्द, वाकी बुद्रुक, चिंबळी, कुरुळी, चाकण (ता. खेड) या गावातील मोजणी करून भूसंपादन प्रक्रिया करण्याचे निर्देश देण्यात आले.

### उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष

**» चाकण औद्योगिक क्षेत्रासह या परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या परिसराला भेट देऊन पाहणी केली होती. त्यावेळी त्यांनी रस्त्यांची कामे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना शासकीय यंत्रणांना दिल्या होत्या.**

तसेच, चाकण शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी मेदनकरवाडी, कडाचीवाडी, नाणेकरवाडी आणि खराबवाडी या गावांमधील जमिनींचे भूसंपादन करून पर्यायी बाह्य वळण रस्ते तयार करण्याबाबत चर्चा झाली. मुळशी तालुक्यातील बालेवाडी ते शेडगेवस्ती, सूर्या हॉस्पिटल ते ठाकर वस्ती आणि नांदे – माण यासह इतर मार्गावरील भूसंपादन प्रस्तावांचा आढावा यावेळी घेण्यात आला. नवले पूल भागातून वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजनांवरही चर्चा करण्यात आली.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी आणि नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील, मुख्य अभियंता रिनाज पठाण, भूसंपादन समन्वय अधिकारी कल्याण पांढरे, सहआयुक्त हिम्मत खराडे, भूमिअभिलेख विभागाच्या अधीक्षक आशा जाधव, पुणे महापालिका, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग यासह इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# एरोसिटीतील भूखंडाचे मूल्य किमान 1 ते 2 कोटी

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे पुणे विभागाच्या मुख्य अभियंत्यांना निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर विमानतळासाठी संपादित करण्यात येणाऱ्या जमिनीचे क्षेत्र निम्म्याने कमी करण्यात आले असून, संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना १० टक्के विकसित भूखंड देण्यात येणार आहे. त्यासह घरांचे संपादन होत असलेल्या जागामालकांना २५० चौरस मीटरचा निवासी भूखंड देण्यात येणार आहे.



या घरात एकापेक्षा जास्त कुटुंबे राहत असल्यास कागदपत्रे तपासून त्यांनाही निवासी जागा देण्यात येणार आहे. एरोसिटीमध्ये असलेल्या भूखंडाचे मूल्य किमान १ ते २ कोटींचे असल्याने प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने कार्यपद्धती निश्चित केली आहे.

पुरंदर विमानतळासाठी सात गावांमधील जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यासाठी संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना एरोसिटीत १० टक्के विकसित भूखंडासह चार पट मोबदलाही देण्यात येणार आहे. भूखंडापोटी मोबदल्यातून १० टक्के रक्कम कपात करू ती एमआयडीसीकडे जमा केली जाणार आहे. संपादनात परतावा औद्योगिक, वाणिज्यिक किंवा निवासी परतावा क्षेत्र १०० चौरस मीटरपेक्षा कमी होत असले तरी अशा बाधितांना किमान १०० चौरस मीटरचा वाणिज्यिक भूखंड देण्यात येईल. एरोसिटीमध्ये वाटप करण्यात आलेल्या भूखंडांकरिता भूखंड वाटप दिनांकापासून किंवा ताबा तारखेपासून त्यापैकी जे नंतर घडेल तेव्हापासून दोन वर्षे हस्तांतरण करता येणार नाही.

प्रकल्पबाधित कुटुंबाचे घर संपादन झाले असल्यास त्यांना एरोसिटीमध्ये वाटप निवासी विभागात २५० चौरस मीटरचा निवासी भूखंड मोबदला दराने देण्यात येईल. संपादनावेळी संपादित घरात एकाहून जास्त स्वतंत्र कुटुंबे राहत असल्यास त्यासंदर्भात स्वतंत्र शिधापत्रिका, विद्युत जोडणी, गॅस जोडणी आदी पुरावे तपासून स्वतंत्र निवासी भूखंड वाटप होणार आहे. यासाठी पुराव्यांची तसेच प्राथमिक सर्वेक्षणातील नोंदीची पडताळणी प्रादेशिक अधिकाऱ्यांच्या स्तरावर करावी, असे निर्देश या कार्यपद्धतीत आहे.

ज्या प्रकल्पबाधितांची संपूर्ण जमीन संपादित झाली असेल व ते भूमिहीन झाले असतील तर अशा बाधितांना ७५० दिवसांची किमान कृषी मजुरी त्रैमासिक हप्त्यामध्ये रोख रक्कम देण्यात येईल. तर ज्या प्रकल्पबाधितांची जमीन संपादित होऊन ते अल्पभूधारक ठरत असल्यास अशा बाधितांना ५०० दिवसांची कृषी मजुरी त्रैमासिक हप्त्यांमध्ये रोख रकमेद्वारे देण्यात येईल. घर संपादित झालेल्या प्रकल्पबाधितांना हस्तांतरणासाठी ४० हजार रुपयांचे अनुदान मिळेल. तर गोठा, शेड संपादित होत असल्यास स्थलांतरासाठी प्रतिगोठा, शेड २० हजारांचे अर्थसाहाय्य देण्यात येईल. प्रकल्पांचे सर्वेक्षण प्रशिक्षण व रोजगार स्वयंरोजगार तसेच व्यवसाय उभारणीसाठी प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील एक ट्रेड प्रशिक्षणाचे शुल्क महामंडळामार्फत भरण्यात येईल. प्रकल्पबाधितांना उद्योजकतेबाबत मार्गदर्शनही करण्यात येणार आहे. प्रकल्पबाधितांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे प्राधान्याने नोकरी देण्यात येईल.